**अभंग २५२.** प्रल्हादपरीक्षितीध्रुवबळीम्हणती ॥ उपमन्यागतिक्षीरसागरीं ॥ १ ॥ भक्तहेतरलेनामाचेनिबळें ॥ कळिकाळासिखेळेदोंअक्षरीं ॥ ध्रु० ॥ आदिअंबऋषीभक्तनिजसखा ॥ दोंअक्षरींलेखाकेलातेणें ॥ २ ॥ उद्धवअक्रूरआणि तोविदुर ॥ दोंअक्षरींपारउतरले ॥ ३ ॥ हनुमंतदासरामनामेंउदास ॥ कळिकाळासीभाषसांगतसे ॥ ४ ॥ द्रौपदीसुभद्रागोपाळगोपिका ॥ बळीभद्रसखादोंअक्षरीं ॥ ५ ॥ नंदतोवसुदेवउग्रसेनराजा ॥ यादवपैंपैजादोंअक्षरीं ॥ ६ ॥ निवृत्तिम्हणे अक्षरदोनीरामनाम ॥ जपतांपावेधामवैकुंठींचें ॥ ७ ॥ श्रीगुरुःप्रसन्नोऽस्तु ॥

**अभंग २५३.** पंढरीयेचोखरूपडेंअशेख ॥ भीमातीरींदेखपुण्यभूमी ॥ १ ॥ आदिपीठदेवब्रह्महेंस्वयमेव ॥ पुंडलीकभावप्रगटला ॥ ध्रु० ॥ जनहेंकाळतारक गोपाळ ॥ कीर्तनींकळिकाळदुरीठाये ॥ २ ॥ नामहेंविठ्ठलनलगेपैंमोल ॥ नित्यतासकळपांडुरंग ॥ ३ ॥ त्रिविधतापपापत्यजितीलअमूप ॥ पुरतीलसंकल्पएक्या नामें ॥ ४ ॥ निवृत्तिम्हणेधन्यजोकीर्तनकरी ॥ सर्वत्रचराचरींबोलियेलें ॥ ५ ॥

**अभंग २५४.** सर्वकामधनसर्वसिद्धिपूर्ण ॥ पतीतपावनहरिएक ॥ १ ॥ तें रूपपंढरीपुंडलिकावोळलें ॥ आणूनिठेविलेंभीमातीरीं ॥ ध्रु० ॥ नलगतीत्यासिद्धिकरणेंउपाधी ॥ नित्यचित्तशुद्धिविठ्ठलनामें ॥ २ ॥ कळिकाळासित्रासचित्तींहृषिकेश ॥ उगवलादिवससोनियाचा ॥ ३ ॥ त्रिभुवनींथोरक्षेत्रपैंसाचार ॥ विठ्ठल उच्चारभीमातीरीं ॥४॥ निवृत्तितत्परनिवालासत्वर ॥ नित्यताआचारविष्णुमय॥५॥

**अभंग २५५.** प्रालब्धसंचितविठ्ठलदैवत ॥ कुळींउगवतभाग्ययोगें ॥१॥ तें रूपपंढरीउभेंअसेसानें ॥ त्रिभुवनध्यानेंवेधियेलें ॥ ध्रु० ॥ उगवलीज्योतिप्रभापैं फाकती ॥ नाहींदीनरातीपंढरीसी ॥ २ ॥ प्रभातहरपेसायंकाळलोपे ॥ दिनमणीदीपेविठ्ठलप्रभा ॥ ३ ॥ पृथ्वीहेढिसाळवायुव्योमफळ ॥ सेवितांअढळजोडती रया ॥ ४ ॥ निवृत्तिसप्रेमजोडतीसर्वकाम ॥ पंढरीयेरामविश्रामले ॥ ५ ॥

**अभंग २५६.** नित्यहरिकथानित्यनामावळी ॥ वैष्णवांचेकुळींधन्यजन्म ॥१॥ म्हणोनिपंढरीउपजावेंसंसारीं ॥ प्रत्यक्षश्रीहरितीरींउभा ॥ ध्रु० ॥ नित्यतादिवाळीनाहींतेथेंद्वैत ॥ नित्यताअच्युततिष्ठतुसे ॥ २ ॥ निवृत्तिसादरविष्णुमयसार ॥ विठ्ठलआचारपंढरीये ॥ ३ ॥

**अभंग २५७.** भवजळकायापंचतत्वमाया ॥ भजनउपायापंढरीरावो ॥ १ ॥ तारकपंढरीप्रसिद्धभीमातीरीं ॥ श्रीदेंचराचरींबोलेवेदु ॥ ध्रु० ॥ मायामोहजाळ ममतानिखळ ॥ सेवितांसकळहोयहरि ॥ २ ॥ निवृत्तीचेंफळसकळगोपाळ ॥ तोडीमायाजाळसंकीर्तनें ॥ ३ ॥

**अभंग २५८.** विठ्ठलश्रीहरिउभाभीमातीरीं ॥ तिष्ठतीकामारीमुक्तिचारी ॥१॥ मुनिजनांसुखनिरंतरलक्ष ॥ भक्तांसीनिजसुखदेतअसे ॥ ध्रु० ॥ पुंडलिकपुण्यमेदिनीकारुण्य ॥ उद्धरिलेजनअनंतकोटी २ ॥ निरानिरंतरभीमरथीतीर ॥ ब्रह्महेंसाकारइटेनीट ॥ ३ ॥ नित्यताभजनजनींजनार्दन ॥ ब्रह्मादिकखूणपावताती ॥ ४ ॥ निवृत्तितत्परहरिरूपसर्वत्र ॥ नामघेतांतृप्तआत्माराम ॥ ५ ॥

**अभंग २५९.** निरपेक्षतामनअनक्षरमौन्य ॥ प्रकाशसंपूर्णतयाब्रह्मा ॥ १ ॥ ऐसेंरूपपाहाक्षरेंदिशादाहा ॥ सर्वभावेंमोहाएकाकृष्णा ॥ ध्रु० नित्यताअढळनित्यपणेंवेळ ॥ विकाशआकळेनित्यतेजें॥ २ ॥ रूपससुंदरपवित्रआगर ॥ चोखाळ साकारपवित्रपणें ॥ ३ ॥ नेणेंहेंविषयआकारनमाये ॥ विकारनसाहेतयारूपा ॥४॥ निवृत्तितत्परकृष्णहासाकार ॥ ॐतत्सदाकारहरिमाझा ॥ ५ ॥

**अभंग २६०.** पुंडलिकपेठेंवैष्णवाचाहाट ॥ करितीबोभाटहरिनामाचा ॥१॥ वाळलेंअंबरअमृततुषार ॥ झेलीतअमरचकोरझाले ॥ ध्रु० ॥ देवमुनीसर्वब्रह्मादिकलाटे ॥ पंढरीयेपेंठेप्रेमपिसे ॥ २ ॥ निवृत्तिनिवोळलाज्ञानदेवसोपान ॥ खेंचरतल्लीनवीनटला ॥ ३ ॥

**अभंग २६१.** हरिदाससंगेंहरिदासखेळे ॥ ब्रह्मादिकसोहळेभोगिताती ॥१॥ संतमुनिदेवसनकादिकसर्व ॥ त्याहींमनोभावअर्पियेला ॥ ध्रु० ॥ पुंडलिकफळ वोळलेंसकळ ॥ शंकरसोज्वळप्रेमेंडुल्ले ॥ २ ॥ निवृत्तिलोळतचरणरजींलाटा ॥ माजित्यावैकुंठाआत्मालिंगीं ॥ ३ ॥

**अभंग २६२.** वोळलेंदुभतेंसर्वांसिपुरतें ॥ प्रेमाचेंभरितेंवैष्णवासी ॥ १ ॥वोळतीचरणींवैष्णवगोमटे ॥ पुंडलिकपेंठेहरिआला ॥ ध्रु० ॥ सोपानखेंचरज्ञानदेवलाटा ॥ देतातीवैकुंठाक्षेमसदा ॥ २ ॥ निवृत्तीनेंहृदयींपूजिलेंतेंरूप ॥ प्रत्यक्ष स्वरूपविठ्ठलराज ॥ ३ ॥

**अभंग** २६३. सोपानसंवगडास्वानंदज्ञानदेव ॥ मुक्ताईचाभावविठ्ठलराज ॥ १ ॥ दिंडीटाळघोळगातीविठ्ठलनाम ॥ खेचरासीप्रेमविठ्ठलाचें ॥ ध्रु० ॥ नरहरिविठानारातेगोणाई ॥ प्रेमभरितडोहींवोसंडती ॥ २ ॥ निवृत्तिप्रगटज्ञानदेवासांगे ॥ पुंडलिकसंगेंहरिखेळे ॥ ३ ॥

**अभंग** २६४. कालातंवनिकटीश्रीरंगजाले ॥ भक्तांचेसोहळेपुरविले ॥ १ ॥ ह्ये पुनदींकालाएकत्रपैंजाला ॥ दहींभातझेलाझेलीतुदेव ॥ ध्रु० ॥ तोचिकवळु घेतुनामयासीदेतु ॥ ज्ञानासिभरीतुपूर्णतोषें ॥ २ ॥ निवृत्तिसोपानकालवलेकालीं ॥ खेचराचीधालीताहानभूक ॥ ३ ॥

**अभंग** २६५. वैष्णवांचामेळसकळमिळाला ॥ विठ्ठलनामकालापंढरीसी॥ १ ॥ हरिनामविनटहरिउच्चारीत ॥ सप्रेमडुल्लतभक्तजन ॥ ध्रु० ॥ चालिलासोपान ज्ञानदेवनिधी ॥ मुक्ताईगोविंदींतल्लीनता ॥ २ ॥ निवृत्तिखेचरपरसाभागवत ॥ आनंदेंडुल्लतसनकादिक ॥ ३ ॥

**अभंग** २६६. चांगयालाधलेंनामयाफळलें ॥ दिधलेंविठ्ठलेंहरिकृपा ॥ १ ॥ प्रेमाचेपुतळेभीमातीराआले ॥ जयजयकारकेलेहरिभक्तीं ॥ ध्रु० ॥ वैकुंठआपण भक्तांमाजिखेळे ॥ पुंडलिकलीळेंखेळतुसे ॥ २ ॥ निवृत्तिनिवालाआनंदेंनाचतु॥ उन्मनीभरितुज्ञानदेव ॥ ३ ॥

**अभंग** २६७. आनंदसर्वांचाकालाअरुवार ॥ नामयासाचारफुंदतुसे ॥ १ ॥ राहिरखुमाईसत्यभामामाता ॥ आलियात्वरिताकाल्यामाजी ॥ ध्रु० ॥ उचलिलानामाप्रेमाचेंस्फुंदन ॥ नुघडीतोनयनकांहींकेल्या ॥ २ ॥ बुझावितराहीरखुमादेवीबाही ॥ पीतांबरसाईकरितीहरि ॥ ३ ॥ ज्ञानासीकवळुसोपानासीवरु ॥ खेचराअरुवारुकवळुदेतु ॥ ४ ॥ निवृत्तिपूर्णिमाभक्तीचामहिमा ॥ नामयासिसीमाभीमातीरीं ॥ ५ ॥

**अभंग** २६८. तंवआनंदलाहरिपरिपूर्णलोटला ॥ मुक्ताईलाधलाप्रेमकवळु ॥ १ ॥ चांगयाचेमुखींघालीतकवळु ॥ आपणगोपाळुदयासिंधु ॥ ध्रु० ॥ दिधलें तेंघेईपूर्णतेंहोई ॥ सप्रेमाचेडोहींसंतजन ॥ २ ॥ नामयाविठयानारयालाधलें ॥ गोणाईफावलेंअखंडित ॥ ३ ॥ राहीरखुमाईकुरवंडीकरिती ॥ जिवेंवोंवाळिती नामयासी ॥ ४ ॥ निवृत्तिखेंचरज्ञानदेवहरि ॥ सोपानझडकरीबोलाविला ॥ ५ ॥

**अभंग** २६९. आपुलेनिहातेंकवळुसमर्पी॥ब्रह्मार्पणमुखींब्रह्मपणें ॥ १ ॥ सोपानसांवतानिवृत्तिनिधान ॥ यासिजनार्दनकवळदेतु ॥ ध्रु० ॥ ब्रह्मपदहरिबाह्यअभ्यंतरीं ॥ सर्वत्रश्रीहरिदिसेतया ॥ २ ॥ देऊनिहस्तकपुशीपीतांबरें ॥ पुसतसे

आदरेंकायआवडे ॥ ३ ॥ राहीरखुमाईकासवीतुषार ॥ अमृतपाझरसर्वांघटीं॥४॥ निवृत्तिखेचरसोपानसांवता ॥ हरिकवळुदेतांतृप्तजाले ॥५॥ श्रीरामगुरु ॥

**अभंग २७०.** गोपाळसंवगडेआलेवाडेंकोडें ॥ असंख्यबागडेहरिरूपीं ॥१॥ बिंबलीपंढरीहरीरूपींसार ॥ अवघाशृंगाराविठ्ठलराजु ॥ध्रु०॥ कालायाकौशल्यनामदेवजाणे ॥ तेथिलीयेखुणेनिवृत्तिराजु ॥ २ ॥ ज्ञानदेवसोपानजगमित्रनागा ॥ नरहरिवेगाझेलिताती ॥ ३ ॥ वैकुंठसांवळेमाजीभक्तमेळे ॥ कालाएक्याकाळें करिताती ॥ ४ ॥ निवृत्तिसंपूर्णताघेऊनिउद्गारु ॥ सेविलाउदारुहरिराणा ॥ ५ ॥

**अभंग २७१.** पांडुरंगहरिमाजीभक्तजन ॥ कैसेंवृंदावनशोभतुसे ॥ १ ॥ ब्रह्मादिकठेलेविमानेंअंबरीं ॥ कालातोगजरींपंढरीये ॥ ध्रु० ॥ सनकादिकदेवदेवढापाउलीं ॥ गोपाळवांकुलीदाविताती ॥ २ ॥ पुंडलिकनाचेदेवमुनीसर्व ॥ भीमातीरींदेवप्रगटले ॥ ३ ॥ ज्ञानदेवसोपानविसोबाखेचर ॥ नरहरिसोनारनाचताती ॥ ४ ॥ निवृत्तिमुक्ताईचांगदेवगाढा ॥ हरिचापवाडाझेलिताती ॥५॥

**अभंग २७२.** सत्यभामामायेअन्नपूर्णाहोये ॥ वेळोवेळांसूयेकवळुमुखीं ॥१॥ राहीरखुमाईआदिमातामोहें ॥ नामातोउपायेंबुझाविती ॥ ध्रु०॥ घेरेनाम्याग्रासब्रह्मींचागळाला ॥ आवडसिगोपाळांप्रीतीहूनी ॥ २ ॥ कुर्वाळितोहरिनुवढीतो दृष्टी ॥ सप्रेमाचापोटींअधिकहोसी ॥ ३ ॥ धरूनिहनुवटीपाहेकृपादृष्टी ॥ आनंदाचेंसृष्टिमाजीनामा ॥ ४ ॥निवृत्तिज्ञानदेवसोपानचांगाहरि ॥ यांसिपरोपरी कवळुदेतु ॥ ५ ॥

**अभंग २७३.** नुघडितांदृष्टिनबोलेतोवाचा ॥ हरिरूपींसाचातल्लीनता ॥१॥ उठिउठिरेनाम्याचालरेसांगातें॥माझेआवडतेजीवलगे ॥ ध्रु० ॥ कुरवाळिलाकरें पुसतुसेगुज॥घेईब्रह्मबीजसदोदीत ॥ २ ॥ ज्ञानासिलाधलेंनिवृत्तिफावलें ॥ सोपानाघडलेंदिनकाळ ॥ ३ ॥ तेंहेंरेसखयाखेचरासिपुसे ॥ गुरुनामींविश्वासेब्रह्मरूपें ॥ ४ ॥ निवृत्तिह्मणेआतांअनाथाश्रीहरि ॥ तूंचिचराचरींहेचिखुण ॥ ५ ॥

**अभंग** ॥ २७४. नुघडूनियादृष्टिनामापाहेपोटीं ॥ आनंदाचीसृष्टितयाजाली ॥ १ ॥ घेरेनाम्याकवळुआनंदाचाहोसी ॥ तुजमाजिनिवासिहरिआहे ॥ध्रु०॥ नामापसरीमुखआनंदलातृप्त ॥ केवळपूर्णभरितहारिराज ॥ २ ॥ निवृत्तीनेंसेविला कवळुहाहरि ॥ तूंचिचराचरींदिससीआम्हां ॥ ३ ॥

**अभंग २७५.** तंतवितंतत्यामाजिमथित ॥ नादउमटतस्वानंदाचा ॥ १ ॥ सोहंबीजतत्वगुरुनाममंत्र ॥ ज्ञानीउपासितहरिराज ॥ ध्रु० ॥ भेदूनिकुंडलणी गोल्हाटनिकट ॥ आत्मारामपेंठपांडुरंग ॥ २ ॥ निवृत्तिम्हणेमीसर्वस्वहोईन ॥

हरिहाहोभरिनपूर्णदेहीं ॥ ३ ॥ पं० मा० स०

**अभंग** २७६. आगमआणिनिगमसर्वसर्वोत्तम॥ दिननिशीरामसेवीतुसे॥१॥ आत्मागोडहरिआम्हांचाडधरी ॥ अरितेसंहारितोआम्हांमाजी ॥ ध्रु० ॥ नेवो हरिविणदुजेंतेंपैंभिन्न ॥ सांगीतलीखूणगुरुराजें ॥ २ ॥ निवृत्तिगयनिप्रसादउन्मनी ॥ निरंतरध्यानींरामनाम ॥ ३ ॥

**अभंग** २७७. भक्तीचेंमहिमानभक्तांसिफळलें॥ दिनकाळकेलेंब्रह्मार्पण॥१॥ ब्रह्मार्पणंरामसंतोषरूपजाला ॥ ब्रह्मचिरूपकेलाआपण्याऐसा ॥ ध्रु० ॥ सर्वब्रह्म रामवेदादिकशब्द ॥ आपणगोविंदसर्वांघटीं॥ २ ॥ निवृत्तीनेंब्रह्मदेखिलेंपरिपूर्ण॥ माजिसनातनब्रह्मसुखें ॥ ३ ॥

**अभंग** २७८. सर्वहरिब्रह्मवेदादिकमती ॥ श्रुतिहीबोलतीतेणेंपंथें ॥ १ ॥ ब्रह्मामाजिजयोब्रह्मांडउदयो ॥ ब्रह्महेंस्वयमेवोआत्माराम ॥ ध्रु० ॥ शास्त्रेंसमवायउपनिषदेंगोमती ॥ चैतन्याचीश्रुतीब्रह्ममय ॥ २ ॥ निवृत्तिनिरोपणसर्वनारायण ॥ हरिविणदिनरितानाहीं ॥ ३ ॥

**अभंग** २७९.श्रुतिशास्त्रवेदयांसिनाहींभेद ॥ भेदवादींद्वंद्ववेगळेंपडे ॥ १ ॥ वेगळाभात्रितांवेगळाचीहोये ॥ ब्रह्मासिनसाहेतेथिंचामळ ॥ध्रु०॥ मळेंसिवोविळा राहाटींगोंविला ॥ तोकैसाखुंटलाबोलोंआम्हीं॥२॥ निवृत्तिसाधननकराहाविश्वास ॥ गुरुविणपाशनतुटती ॥ ३ ॥

**अभंग** २८०. ध्येयध्याताध्यानज्ञेयज्ञाताज्ञान ॥ दृश्यद्रष्टाभानहरपती ॥१॥ पूज्यतेपूजकपूजनस्वभाव ॥ अंतीब्रह्मएवब्रह्मामाजी ॥ ध्रु० ॥ तेचिहेधारणा तर्कसर्वपूर्णा ॥ विवेकहीखुणासहजस्थिती ॥ २ ॥ निवृत्तिधारणाब्रह्मसनातना ॥ नित्यनारायणाचिंतीसुखें ॥ ३ ॥

**अभंग** २८१. गगनींचागगनींतेजपूर्णधरणी॥आपणचितरणीजगायया॥१॥ ब्रह्ममाजीवेडेगोपाळसंगती ॥ वेदवाखाणितीज्याचीमहिमा ॥ ध्रु० ॥ लोपती त्याताराहारपेदिनमणी ॥ तोखेळेचक्रपाणीगोपाळामाजी ॥ २ ॥ निवृत्तिनिधान श्रीरंगखेळतु ॥ गोपिकांसीमातुहळुहळु ॥ ३ ॥

**अभंग** २८२. गगनघोंटीतउठिपृथ्वीसगळीदाटी ॥ आपणचिपाठीकूर्मजाला ॥ १ ॥ कांसवितुषारअमृतसधर ॥ भक्तपारावारतारियेले ॥ ध्रु० ॥ उचलितीढिसाळसर्वहागोपाळ ॥ तोयशोदेचाबाळनंदाघरीं ॥ २ ॥ निवृत्तीसादरहरिरूपश्रीधर ॥ आपणचराचरविस्तारला ॥ ३ ॥

**अभंग** २८३. निरालंबबीजप्रगटेसहज ॥ तोगौळियांचेंकाजकरीकृष्ण॥१॥

हरिहासांवळावेधिलियाबाळा ॥ माजिल्यागोपाळागायीचारी ॥ ध्रु० ॥ वंदिती सुरनरगणब्रह्मादिकशरण ॥ तोयशोदेसिस्तनमागेहरि ॥२ ॥ निवृत्तीध्यानमनाचेंउन्मन ॥ योगियांजीवनहरिमाझा ॥ ३ ॥

**अभंग** २८४. वैकुंठदैवतदेवामुगुटमणी ॥ ऐकीजेपुराणींकीर्तिज्याची ॥१॥ तोहरिबाळकगोपिकाकौतुक ॥ गोपाळसकळिकसंवगडे ॥ ध्रु० ॥ आदिशिवाजपजपतुअमुप ॥ तेंप्रत्यक्षस्वरूपनंदाघरीं ॥ २ ॥ निवृत्तिसमाधिउगवलीसकळिकां ॥ तारितिन्हीलोकाएकानामें ॥ ३ ॥

**अभंग** २८५. ब्रह्मांडउतरंडीज्याचेइच्छेघडी ॥ तोउच्छिष्टेंकाढीधर्माघरीं ॥ १ ॥ देखिलावोमायेचक्रभुजस्वभावी ॥ वारुतेवागवीअर्जुनाचे ॥ ध्रु० ॥ याज्ञिकअर्पितीमंत्राच्याआहुती ॥ तोद्रौपदियेप्रतिभाजिमागे ॥ २ ॥ निवृत्तिदैवतपूर्णमनोरथ ॥ पांडवकृतार्थकृष्णनामें ॥ ३ ॥

**अभंग** २८६. ब्रह्मादिकपूजाइच्छितीसहजा ॥ तोगौळियांच्याकाजातिष्ठतुसे ॥ १ ॥ देखिलेंसांवळेंपूजितीगोंवळे ॥ नंदाघरींखेळेस्वामीमाझा ॥ ध्रु० ॥ निवृत्तिदैवतपूर्णमनोरथ ॥ योगियेचिंतितहृदयींजया ॥ २ ॥

**अभंग** २८७. वेदबीजसाचेंसंमतश्रुतीचें ॥ गुह्यशास्त्रांचेंहरिमाझा॥ १ ॥ तोहरिखेळतुप्रत्यक्षमूर्तिमंतु ॥ दुष्टासुक्तिदेतुजीवघातें ॥ ध्रु० ॥ अर्जुनासाह्यकारीद्रौपदिकैवारी ॥ तोविदुराचेघरींअन्नमागे ॥ २ ॥ निवृत्तीचेंधनगोकुळींश्रीकृष्ण ॥ यादवसहिष्णहरिमाझा ॥ ३ ॥

**अभंग** २८८. देवामुकुटमणिऐकिजेपुराणीं ॥ तोहाचक्रपाणिनंदाघरीं ॥१॥ नंदनंदनहारिगोळणिगोरस ॥ गोकुळींहृषीकेशखेळतुसे ॥ ध्रु० ॥ हरिहासकुमारभौमासुरपैजा ॥ वोळलासेद्विजाधर्माघरीं ॥ २ ॥ निवृत्तिरोकडेंनामफाडोवाडें ॥ हरिरूपचहूंकडेदिसेआम्हां ॥ ३ ॥

**अभंग** २८९. योगियांचेंधनतेंब्रह्मसंपन्न ॥ तोहाजनार्दननंदाघरीं ॥ १ ॥ हरीरूपमायेसर्वांघटींआहे ॥ दूधलोणीखायेगौळियांचें ॥ ध्रु० ॥ चिंतिअजामेळानामआलेंमुखा ॥ तोवैकुंठींच्यासुखादेतुहरि ॥ २ ॥ निवृत्तीचेंधनजगाचेंजीवन ॥ नामनारायणतरुणोपाव ॥ ३ ॥

**अभंग** २९०. जेथुनिउद्गारुप्रसवेॐकारु ॥ तोचिहाश्रीधरुगोकुळींवसे ॥१॥ जनकुहाजगाचाजीवलगुसाचा ॥ तोहरिआमुचानंदाघरीं ॥ ध्रु०.॥ नमायेवैकुंठींयोगियांचेभेटी ॥ पाहातांज्ञानदृष्टिनयेहातां ॥ २ ॥ निवृत्तिम्हणेदेवाम्हणविताहेरावो ॥ तोसुखानुभवोयादवांसी ॥३ ॥

**अभंग** २११. नाहींहाआकारनाहींतोविकार ॥ चतुर्भुजकरहरिमाझा ॥१॥ हरिरूपजेजपहरिहररूप ॥ गौळियांचेंतपसहजकृष्ण ॥ ध्रु० ॥ हरिरूपघरींसोळासहस्रनारी ॥ तोबाळब्रह्मचारीगायीराखे ॥ २ ॥ निवृत्तिरोकडेंब्रह्ममाजिवडें ॥ तोयशोदेचेपुढेंलोणीमागे ॥ ३ ॥

**अभंग** २१२. नाहींयासिगोतनाहींयासीकूळ ॥ शेखींआचारशीळकोणम्हणे ॥ १ ॥ बाळरूपेंहरिगोकुळींलोणीचोरी ॥ त्यायशोदापाचारीस्तनद्याया ॥ध्रु०॥ सांवळांहरिवागवीसिदोरी ॥ गोपाळांच्याकरींकालादेतु ॥ २ ॥ निवृत्तिसंपूर्णकवळुदेतुजाण ॥ ब्रह्मसनातनगोकुळींचें ॥ ३ ॥

**अभंग** २१३. नसाहेदुजेंपणआपणआत्मखुण॥श्रुतीहीसंपूर्णहारपती॥१॥वेदरूपश्रीकृष्णयोगियाजीवन ॥ तेंरूपपरिपूर्णआत्माराम ॥ ध्रु० ॥ नदिसेवैकुंठीं योगियांध्यानबीज ॥ तोगोपाळांचेंकाजकरीहरि ॥२॥ निवृत्तिगयनीहरिउच्चारित ॥ माजिकरिमनोरथपुरिकामासिद्धि ॥ ३ ॥

**अभंग** २१४. हेंव्यापूनिनिराळाभोगीवैकुंठसोहळा ॥ नंदाघरींगोपाळाहरि माझा ॥ १ ॥ नसाहेसगुणअवघाचिनिर्गुण ॥ तोकृष्णआपणगोपाळवेषें ॥ध्रु०॥ गायीचारीहरिखांद्यावरी ॥ वेणुनानापरिवातुअसे ॥ २ ॥ निवृत्तिगयनीकृपाजपतोअमुपजाण ॥ सांगीतलीखूणगोरक्षानें ॥ ३ ॥

**अभंग** २१५. दिसेवरिवरिनामअवघेंवैकुंठधाम ॥ जपतोशिववमेरामनामें ॥ १ ॥ तेंरूपसमरसगोकुळींहृषीकेश ॥ नंदाघरींगोपवेषेंहरिखेळे ॥ ध्रु० ॥ समाधिवनधामवैकुंठहरिसम ॥ योगियांपूर्णकामहृदयींसदा ॥ २ ॥ निवृत्तीनेंकथिलेंगुरुगयनीप्रसादें ॥ सकळहागोविंदआत्माराम ॥ ३ ॥

**अभंग** २१६. सर्वस्वरूपेंनामसर्वघटींघनश्याम ॥ तोगोकुळींआत्मारामदूध मागे ॥ १ ॥ भाग्येंविणदुभतेंदैवउभडतें ॥ नंदाघरींआवडतेहरिखेळे ॥ ध्रु० ॥ मंजुळवेणुवायेंलुब्धल्याधेनुवा ॥ नंदाघरींदुहावापूर्णवाहे ॥ २ ॥ घरोघरींदुभतें गौळियांपरिपूर्ण ॥ यशोदातेआपणगोरसघुसळी ॥ ३ ॥ गोगोपाळहरिखुनंदायशोदेदेख ॥ गौळियांकौतुककरितीहरि ॥ ४ ॥ निवृत्तिगयनीदेवउपदेशिलासर्व॥ गोरक्षींगुह्यभावसांगतिमज ॥ ५ ॥ श्रीरामगुरुप्रसन्न ॥

**अभंग** २१७. गोकुळींवैकुंठवसेगोपाळांमाजी ॥ सौरसेंअभक्तानदिसेकाय करूं ॥ १ ॥ पूर्वपुण्यचोखडेंब्रह्मांडकोडें ॥ तेंयशोदेकडेंशोभेकैसा ॥ ध्रु० ॥ वसुदेवअमुपदेवकीयेसमीप ॥ वैकुंठींचेदीपलाडेंकोडें ॥ २ ॥ उग्रसेनसंप्रधारकेलाराज्यधर ॥ यादवपरिवारराम‌कृष्ण ॥ ३ ॥ द्वारकानाथहरिसोळासहस्रनारी ॥

बळिरामपरिवारीहरिमाझा ॥ ४ ॥ निवृत्तिजीवनध्यानएकरामकृष्ण ॥ उच्चारणींकोटियज्ञहोतीनामें ॥ ५ ॥

**अभंग** २९८. भाग्येंविणनसेजनाभावनसे ॥ तेथेंसर्वदिसेहरिमाझा ॥ १ ॥ फळलेंअमूपकृष्णनामरूप ॥ उच्चारितांखेपहरेजनां ॥ ध्रु० ॥ नंदतेयशोदादेवकीमुकुंदा ॥ वसुदेवसदांभाग्यनिधी ॥ २ ॥ निवृत्तिसंपूर्णगुरुमुखेंखुण ॥ भाग्येंविणजाणनयेमुखा ॥ ३ ॥ श्रीगुरु ॥

**अभंग** २९९. रूपहेंसांवळेंभोगिताडोळे ॥ उद्धवासोंहळेअक्रूरासी ॥ १ ॥ पदरजवंदीध्यानहेंगोविंदीं ॥ उद्धवमुकुंदींतल्लीनता ॥ ध्रु० ॥ विदुरसुखाचानाम जपेवाचा ॥ श्रीकृष्णतयाचाअंगीकारी ॥ २ ॥ निवृत्तीचेंध्यानज्ञानदेवखूण ॥ सोपानआपणनामपाठें ॥ ३ ॥

**अभंग** ३००. वैकुंठदुभतेंनंदाघरींमाये ॥ तेंपूर्णपान्हायेयशोदेसी ॥ १ ॥ तेंरूपरूपसकांसवीप्रकाश ॥ योगिजनमानसनिवताती ॥ ध्रु० ॥ सुंदरसुनीळराजसगोपाळ ॥ भक्तीसिदयाळएक्यानामें ॥ २ ॥ निवृत्तिगयनीमनतेचरणीं ॥ अखंडताध्यानींतल्लीनता ॥ ३ ॥श्री॥

**अभंग** ३०१. ब्रह्मांडकरीहरिब्रह्मझाडाकरी ॥ तेंनंदयशोदेघरींखेळतुसे ॥१॥ त्रैलोक्यदुर्लभब्रह्मादिकांसुलभ ॥ रुक्मिणीवल्लभकृष्णसांवळा ॥ ध्रु० हिरण्याक्ष वधूनिदाढेवरिमेदिनी ॥ तोहाचक्रपाणीयशोदेचा ॥ २ ॥ रामावतारुगाढादशशीरारगडा ॥ रिठासुरदाढातेणेंपाडें ॥ ३ ॥ चतुर्भुजश्रीपतिसकुमारसाजती ॥ शंखचक्रांकितीहरिमाझा ॥ ४ ॥ निवृत्तिध्यानशूरसर्वरूपेंश्रीधर ॥ जिंकिलाभौमासुरणयुद्धीं ॥ ५ ॥

**अभंग** ३०२. कल्पनामासोळीभवजाळजाळी ॥ पाशाचियेजाळींगुंतताहे ॥ १ ॥ मायाजाळगोंवीभवसिंधुदावी ॥ मनहेंमाधवींगोंवीजना ॥ ध्रु० ॥ विषयाचेंपोखणेंपाहातेथेंशून्य ॥ झणिहेंतूंमनजाउंदेसी॥२॥निवृत्तिसाधनमनहें अनावर ॥ गुरुचरणींथारबिढारधरी ॥ ३ ॥

**अभंग** ३०३. भवार्णवहेतुकायसांगूंमातु ॥ कल्पनाहेतंतुछेदीयेला ॥ १ ॥ नाहींआम्हांठावोनाहींआम्हांगांवो ॥ वासनासंदेहोबुझालासे ॥ ध्रु० ॥ नामाचें सुमनवाचेनारायण ॥ जनींजनार्दनययाहेतु ॥ २ ॥ निवृत्तिनिरोपणब्रह्महेंसाधन ॥ गुरुकृपाखुणहिताआली ॥ ३ ॥

**अभंग** ३०४. भवसागरसारतरणोपावसोपा ॥ कृष्णनामखेपाहरितीजना ॥ १ ॥ रामकृष्णमंत्रजनासिउद्धार ॥ आणिकसाचारमार्गनाहीं ॥ ध्रु० ॥ निष्का-

मकल्पनाआधिसाधीमना ॥ ऐक्यसमीरणाहेंचिकरी ॥ २ ॥ निवृत्तिधारणागुरुचरणखुणा ॥ ब्रह्मांडयाखुणागुरुकृपा ॥ ३ ॥

अभंग ३०५. प्रकृतीचापैंठाकल्पनामाजिठा॥नपवेतोवैकुंठाकर्मजाड्य॥१॥ अहिंसेचेंस्वरूपहेंचिहरिरूप ॥ नह्मणेहरिआपणसर्वआहे ॥ ध्रु० ॥ नाहींत्यासिजयनुद्धरेसर्वथा ॥ हरिविणव्यथाकोणवारी ॥ २ ॥ निवृत्तिह्मणेधरिगुरुचरणसोये ॥ तेणेंमार्गेंपाहेहरिसोपा ॥ ३ ॥

अभंग ३०६. जेथेंपाहेतेथेंव्यापिलेंअनंतें ॥ तयाविणरितेंकोणठाय ॥ १ ॥ गगनेंवीणठावोनाहींजैसारिता ॥ तैसायाअच्युताविणेंकांहीं ॥ ध्रु० ॥ तेथेंमाझ्याचित्ताकरीरहिवासु ॥ नकरीउदासुऐसीयातें ॥ २ ॥ निवृत्तीनेंमनठेविलेंचरणीं ॥ नामाचीनिशाणीअखंडित ॥ ३ ॥

अभंग ३०७. कांसवीचींपिलींकरुणाजरीभाकी ॥ परिसांपडलींनिकींचरणसोय ॥ १ ॥ कामधेनुघरींहरिमाझागोपाळ ॥ मजकाळवेळनाठवेतैसी ॥ ध्रु० ॥ चातकाचीचिंताजरीनपवेजीवन ॥ तरीचशोकेंप्राणतृषाहेतु ॥ २ ॥ निवृत्तिस्वानंदुकामधेनुगुरु ॥ नामाचाउच्चारुतेणेंछंदें ॥ ३ ॥

अभंग ३०८. करुणाकल्लोळणीअमृताचीखोटी ॥ भरलीसेसृष्टिहरिच्यानामें ॥ १ ॥ सर्वहरिआत्मावेदबोलेसीमा ॥ हरिपरब्रह्मरामकृष्ण ॥ ध्रु० ॥ हरिविणठावोनदिसेसर्वत्र ॥ हरिविणपरत्रनाहींनाहीं ॥ २ ॥ निवृत्तीचेंघरगयनीसाचार ॥ त्यामाजिउच्चारहरिआम्हां ॥ ३ ॥

अभंग ३०९. शून्यसाकारघटींजीवशिवकाष्ठीं ॥ मीपणासितुटीएक्यानामें ॥ १ ॥ तेंहेंनामसोपेंरामकृष्णमाळा ॥ यासिकाळवेळनाहींनाहीं ॥ ध्रु० ॥ शून्यहेंहीठायजीवजायेजिवीं ॥ मनहेंमाधवींहरपत ॥ २ ॥ निवृत्तिमग्नशून्याकारघट ॥ गुरुनामेंमठतेथेंकेला ॥ ३ ॥ श्रीगुरु ॥

अभंग ३१०. अनंतब्रह्मांडेंअनंतरचना ॥ शून्यहेवासनातेथेंजाली ॥ १ ॥ मनगेलेंशून्यींध्यानतेंउन्मनीं ॥ चित्तनारायणींदृढमाझें ॥ ध्रु० ॥ तेथेंनाहींठावोवेदांसिआश्रयो ॥ लोपलेंचंद्रसूर्यनाहींसृष्टी ॥ २ ॥ निवृत्तिह्मणेतोठावमजपैठा॥ नेतसेवैकुंठागुरुमाझा ॥ ३ ॥

अभंग ३११. शून्यतेंपुशिलेंनिरशून्यबिंबलें ॥ ब्रह्मउगवलेंतेजाकार ॥ १ ॥ काळासिकरितेवासनाआकळीते ॥ दिनकाळहरितेंसेवीतसे ॥ ध्रु० ॥ माजिटाश्रीहरिदिसेपरोपरी ॥ घटमठसरीएकुशोभे ॥ २ ॥ निवृत्तिदाटुगेंगुरुमुखेंकळलें॥ सर्वत्रगोपाळेंकेलेंमज ॥ ३ ॥

**अभंग ३१२.** ध्याननाउन्मनींदृढनाबंधनीं ॥ सर्वीसर्वपूर्णहरिएकु ॥ १ ॥ वेदाचावेदकुशास्त्रांचाविवेकु ॥ श्रुतिपरलोकुहरिमाझा ॥ ध्रु० ॥ उगवलेंक्षेत्र पिकतेंघोळत ॥ तैसेंहेंअनंतरूपदिसे ॥ २ ॥ निवृत्तिचोखाळगयनीप्रसाद ॥ श्रीरंगगोविंददिधलामज ॥ ३ ॥

**अभंग ३१३.** पूर्विलियेक्षेत्रींपूर्वजपूरता ॥ तरिचअरुताहरिदिसे ॥ १ ॥ सर्वभावींनामबोळलेंसर्वदां ॥ अखंडगोविंदागाऊंगीति ॥ ध्रु० ॥ शामतनुहरिप्रभादिसेभानु ॥ तोमाझाजीवनुहरिआत्मा ॥ २ ॥ निवृत्तीआवडेसद्गुरुगयनी ॥ चित्तनारायणींतल्लीनता ॥ ३ ॥

**अभंग ३१४.** पीतांबरदीपडेंदीपकळिकाशाम ॥ शिवआत्मारामप्रेमतनु ॥१॥ ब्रह्मांडधवळलेंदिसेदशदिशा ॥ ब्रह्मचिसहसाब्रह्मपणें ॥ ध्रु० ॥ नदिसेभानमान दृश्याचाअनुमान ॥ आपणचिपूर्णतदाकार॥ २ ॥ निवृत्तिनिर्विकारमनोमयसार॥ सर्वहाआचारब्रह्मरूप ॥ ३ ॥

**अभंग ३१५.** गगनग्रासघोंटीब्रह्मांडहेंपोटीं॥चैतन्याचीसृष्टिआपणहरि॥१॥ देखिलागेमायेसुंदरजगजेठी ॥ नंदयशोदेदृष्टींब्रह्मखेळे ॥ ध्रु० ॥ आकाशसौरस तत्वसमरस ॥ तोहाहृषीकेशगोपींसंगें ॥ २ ॥ निवृत्तिसाधननिरालंबींध्यान ॥ तोचिहाश्रीकृष्णध्यानमार्गे ॥ ३ ॥

**अभंग ३१६.** चतुराननघनअनंतउपजती ॥ देवोदेवीकितीतयामाजि ॥ १ ॥ तेंचिहेंसांवळेंअंकुरलेंब्रह्म ॥ गोपसंगेंसमवर्तेरया ॥ ध्रु० ॥ निगमानाठवेवेदांचा द्योतकु ॥ तोचतुर्भुजदेखुनंदाघरीं ॥ २ ॥ निवृत्तिह्मणेशंखचक्रांकितमूर्ति ॥ आपणश्रीपतिक्रीडतसे ॥ ३ ॥

**अभंग ३१७.** चिंतितांसाधकमनासिनाकळे ॥ तोगोपिकासीआकळेकरितां ध्यान ॥ १ ॥ देखिलागेमायेसगुणागुणनिधी ॥ यशोदागोविंदींप्रेमपान्हा ॥ध्रु०॥ नमायेसर्वांघटींआपणचिसृष्टी ॥ तोयमुनेच्यातटींगायीचारी ॥ २ ॥ निवृत्तिसाधनकृष्णाचेंरूपडें ॥ ब्रह्मांडाएवढेंतदाकार ॥ ३ ॥

**अभंग ३१८.** निजलक्षाचेंलक्षहरपलेंभान ॥ दिनमानशून्यजयारूपीं ॥१॥ तेंब्रह्मगोजिरेंगोपाळसंगतीं ॥ संवगडेसांगातीभाग्यवंत ॥ ध्रु० ॥ वेणुवाद्यध्वनि- यमुनाजळस्थिर ॥ ध्यानाचाप्रकारकृष्णरासी ॥ २ ॥ निवृत्तिम्हणेतेंस्वरूपसौख्य रूपडें ॥ पाहातीचहूंकडेयोगीजन ॥ ३ ॥

**अभंग ३१९.** अनंतरूपदेवअनंतआपण ॥ अंतर्बाह्यखुणयोगीयांसी ॥ १ ॥ तोहाहरिमायेगोकुळींअवतार ॥ गोपीसंगेंश्रीधरखेळतुसे ॥ ध्रु० ॥ शास्त्रांसिना-

**अभंग ३१२.** ध्याननाउन्मनींढडनाबंधनीं ॥ सर्वींसर्वेपूर्णहरिएकु ॥ १ ॥ वेदाचावेदकुशास्त्रांचाविवेकु ॥ श्रुतिपरलोकुहरिमाझा ॥ ध्रु० ॥ उगवलेंक्षेत्र पिकतेंघोळत ॥ तैसेंहेंअनंतरूपदिसे ॥ २ ॥ निवृत्तिचोखाळगयनीप्रसाद ॥ श्रीरंगगोविंददिधलामज ॥ ३ ॥

**अभंग ३१३.** पूर्विलियेक्षेत्रींपूर्वजपूरता ॥ तरिचअरुताहरिदिसे ॥ १ ॥ सर्वभावींनामबोळलेंसर्वदा ॥ अखंडगोविंदागाऊंगीति ॥ ध्रु० ॥ शामतनुहरिप्र- भादिसेभानु ॥ तोमाझाजीवनुहरिआत्मा ॥ २ ॥ निवृत्तीआवडेसद्गुरुगयनी ॥ चित्तनारायणींतल्लीनता ॥ ३ ॥

**अभंग ३१४.** पीतांबरदीपडेंदीपकळिकाशाम ॥ शिवआत्मारामप्रेमतनु ॥१॥ ब्रह्मांडधवळलेंदिसेदशादिशा ॥ ब्रह्मचिसहसाब्रह्मपणें ॥ ध्रु० ॥ नदिसेभानमान दृश्याचाअनुमान ॥ आपणचिपूर्णतदाकार ॥ २ ॥ निवृत्तिनिर्विकारमनोमयसार॥ सर्वहाआचारब्रह्मरूप ॥ ३ ॥

**अभंग ३१५.** गगनग्रासघोंटीब्रह्मांडहेंपोटीं ॥ चैतन्याचीसृष्टिआपणहरि ॥१॥ देखिलागेमायेसुंदरजगजेठी ॥ नंदयशोदेदृष्टींब्रह्मखेळे ॥ ध्रु० ॥ आकाशसौरस तत्वसमरस ॥ तोहाहृषीकेशगोपींसंगें ॥ २ ॥ निवृत्तिसाधननिरालंबींध्यान ॥ तोचिहाश्रीकृष्णध्यानमार्गे ॥ ३ ॥

**अभंग ३१६.** चतुराननघनअनंतउपजती ॥ देवोदेवींकितीतयामाजि ॥ १ ॥ तेंचिहेंसांवळेंअंकुरलेंब्रह्म ॥ गोपसंगेंसमवर्तेंरया ॥ ध्रु० ॥ निगमानाठवेवेदांचा द्योतकु ॥ तोचतुर्भुजदेखुनंदाघरीं ॥ २ ॥ निवृत्तिह्मणेशंखचक्रांकितमूर्ति ॥ आपणश्रीपतिक्रीडतसे ॥ ३ ॥

**अभंग ३१७.** चिंतितांसाधकमनासिनाकळे ॥ तोगोपिकासीआकळेकरितां ध्यान ॥ १ ॥ देखिलागेमायेसगुणागुणनिधी ॥ यशोदागोविंदींप्रेमपान्हा ॥ध्रु०॥ नमायेसर्वांघटींआपणचिसृष्टी ॥ तोयमुनेच्यातटींगायीचारी ॥ २ ॥ निवृत्तिसाध नकृष्णाचेंरूपडें ॥ ब्रह्मांडाएवढेंतदाकार ॥ ३ ॥

**अभंग ३१८.** निजलक्षाचेंलक्षहरपलेंभान ॥ दिनमानशून्यजयारूपीं ॥१॥ तेंब्रह्मगोजिरेंगोपाळसंगतीं ॥ संवगडेसांगातीभाग्यवंत ॥ ध्रु० ॥ वेणुवाद्यध्वनि- यमुनाजळस्थिर ॥ ध्यानाचाप्रकारकृष्णरासी ॥ २ ॥ निवृत्तिम्हणेतेंस्वरूपसौख्य रूपडें ॥ पाहातीचहूंकडेयोगिजन ॥ ३ ॥

**अभंग ३१९.** अनंतरूपदेवअनंतआपण ॥ अंतर्बाह्यखुणयोगीयांसी ॥ १ ॥ तोहाहरिमायेगोकुळींअवतार ॥ गोपीसंगेंश्रीधरखेळतुसे ॥ ध्रु० ॥ शास्त्रांसिना-

कळेश्रुतितीबरळे ॥ तेंगोपवेषेंखेळेगोपाळांमाजी ॥ २॥ निवृत्तीचेंसारगयनीविचार ॥ ब्रह्मचराचरमाजिवसे ॥ ३ ॥

**अभंग ३२०.** ज्यारूपाकारणेंदेववोळंगणें ॥ योगीगुरुखुणेंसेविताती ॥ १ ॥ तेंरूपगोकुळींगोपाळांचेमेळीं ॥ अखंडसमेळींखेळतुसे ॥ ध्रु० ॥ ब्रह्मांडकडोविकडीब्रह्मांडघडी ॥ यायोगपरवडीहरपती ॥ २ ॥ निवृत्तीचेंधनब्रह्महेंरोकडें ॥ गौळणीत्यापुढेंखेळविती ॥ ३ ॥

**अभंग ३२१.** जेथेंनारिघेठावलाक्षितांलक्षण ॥ सूर्यतारांगणहरपती ॥ १ ॥ तेंरूपरूपसकृष्णब्रह्मनाम ॥ गौळियांसप्रेमवोळलेंसे ॥ ध्रु० ॥ जेथेंलयलक्षहरपोन सोये ॥ द्वैतेंनसाहेसोहंबुद्धि ॥ २ ॥ निवृत्तिमान्यतासेवितुसाकार ॥ आपणतदाकारगोपवेषें ॥ ३ ॥

**अभंग ३२२.** मीपणेंसगळावेदुहरपला ॥ शास्त्रांचाखुंटलाअनुवाद ॥ १ ॥ तेंरूपसुंदरकृष्णनामसोपार ॥ निरालंबगोचरगोकुळींचें॥ ध्रु० ॥ सेवितांयोगियां सुलभदुर्गम ॥ गौळियांसुगमनामघेतां ॥ २ ॥ निवृत्तिनिकटकृष्णनामसार ॥ पापाचासंचारनामेंछेदे ॥ ३ ॥

**अभंग ३२३.** ध्यानाचीधारणाउन्मनीचेंबीज ॥ लक्षितांसहजनयेहातां ॥१॥ तेंहेंकृष्णनामसखेनंदाघरीं ॥ गौळियांमाझारीब्रह्मखेळे ॥ ध्रु० ॥ नदिसेपाहातां शेषादिकागति ॥ यशोदेश्रीपतिबाळजाला ॥ २ ॥ गुंतलेंमायाजाळींअनंतरचनें ॥ तोचतुराननाखुणेंनसंपडे ॥ ३ ॥ नकळेहानिर्धारुतोदेवकीहोदेवी ॥ सेखींतो अनुभवींभुलविला ॥ ४ ॥ निवृत्तिरचनाकृष्णनामेंसार ॥ नंदाचेंबिढारब्रह्मजालें॥५॥

**अभंग ३२४.** हापुरुषकींनारीनव्हेतोरूपस ॥ शेखींजगदीशजगद्रूपें ॥ १ ॥ तेंहेंकृष्णरूपयशोदेकडीये ॥ नंदाघरींहोयेबाळरूप ॥ ध्रु० ॥ ज्यातेंनेणेवेदनेणती त्याश्रुती ॥ त्यागोपिकाभोगितीकामरूपें ॥ २ ॥ निवृत्तीचेंब्रह्मकृष्णनामेंखेळे ॥ असंख्यगोवळेंब्रह्मरूप ॥ ३ ॥

**अभंग ३२५.** जेथेंनाहींविंदुनाहींपैंशाखा ॥ द्वैताचाहालेखाहरपला ॥ १ ॥ तेंरूपवोळलेंनंदायशोदेसार ॥ वसुदेवबिढारभाग्ययोगें ॥ ध्रु० ॥ नमायेपुरताब्रह्मांडउभवणी ॥ त्यालागींगौळणीखेळविती ॥ २ ॥ निवृत्तिब्रह्मसारसेवितुसेसोपें ॥ नामेंपुण्यपापेंहरपती ॥ ३ ॥

**अभंग ३२६.** आगमनिगमाबोलतांवैखरी ॥ तोयशोदेच्याकरींधरूनिचाले ॥ १ ॥ नसंपडेशिवाबैसतांचिध्यानीं ॥ जालियाउन्मनीदृश्यनव्हे ॥ ध्रु० ॥ कमळासनींब्रह्माध्यानस्थबैसला ॥ पाहतांपाहतांमुळानसंपडे ॥ २ ॥ निवृत्तिग-

यनीसांगतुसेखुणा ॥ तोदेवकीचातान्हाबाळजाला ॥ ३ ॥

अभंग ३२७. अष्टांगसाधनेंसाधितीपवन ॥ ज्यासियोगीजनशिणताती ॥१॥ तोहाकृष्णगोपीगोपाळांमाझारी ॥ क्रीडानानापरीकरीआत्मा ॥ ध्रु० ॥ अठरासाहिजणेंबोलतीपरवडें ॥ तोमाखणासिजोडीस्वयेंकर ॥ २ ॥ निवृत्तीचेंध्येय कृष्णहाचिहोय ॥ गयनिनाथेंसोयदाखविली ॥ ३ ॥

अभंग ३२८. ह्मणवितोनंदाचाबाळयशोदेचा ॥ आपणचौवाचातीतकृष्ण ॥ १ ॥ शब्दांसिनातुडेबुद्धिसिसांकडें ॥ तोसप्रेमेंआतुडेस्मरतांनाम ॥ ध्रु० ॥ उपचाराच्याकोटीनपाहेपरवडी ॥ तोप्रेमळाचींघोडींधोईअंगें ॥ २ ॥ निवृत्तीचें तपफळलेंअमुप ॥ गयनिराजेंदीपउजळिला ॥ ३ ॥

अभंग ३२९. अंधारियेरातींउगवेहागभस्ति ॥ मालवेनादीतिगुरुकृपा ॥१॥ तोहाकृष्णहरिगोकुळामाझारीं ॥ हाचिचराचरींप्रकाशला ॥ ध्रु० ॥ आदिमध्य अंततिन्हीजालींशून्य ॥ तोकृष्णनिधानगोपवेषें ॥ २ ॥ निवृत्तिनिकटकृष्णनाम पाठ ॥ आवडींवैकुंठवासिंनले ॥ ३ ॥

अभंग ३३०. नजाणूंल्याकळाकुसरीगोपाळा ॥ नामहेंमंगळाअच्युताचें ॥१॥ हेंचिमजद्यावेंसप्रेमआपुलें ॥ ध्यातुसेपाउलेंएवढ्यासाठीं ॥ ध्रु० ॥ नमागेनेघे कांहींयाविणआणिक ॥ सप्रेमाचीभूकतृष्णाकरी ॥ २ ॥ समर्थाचिघरींकांहींनाहीं उणें ॥ अखंडप्रेमदेणेंकृष्णनामीं ॥ ३ ॥ इतुकेंचिदातारापुरवीमाझेंकोड ॥ याविणकाबाडभारनेघें ॥ ४ ॥ निवृत्तिसप्रेमसंजीवनीमूळ ॥ स्मरतांकाळवेळनाहींनामीं ॥ ५ ॥

अभंग ३३१. परंपराभक्तउत्धरिलेप्रेमें ॥ सांडिलेदुर्गमसांसारिक ॥ १ ॥ नसतेंभवभयहोतेंजेंमानसीं ॥ स्मरतांनामत्यासीनाहींकेलें ॥ ध्रु० ॥ पाहतांतुझें नामरूपदृश्यनोहे ॥ तोभक्तांलागीहोयकृष्णठसा ॥ २ ॥ निवृत्तीचेंनामरूपनिराकार ॥ कृष्णहासाचारगयनिकृपा ॥ ३ ॥

अभंग ३३२. आदिनाथउमाबीजप्रकटिलें ॥ मछिंद्रालाधलेंसहजस्थितीं ॥ १ ॥ तेचिप्रेममुद्रागोरक्षींदिधली ॥ पूर्णकृपाकेलीगयनिनाथा ॥ ध्रु० ॥ वैराग्यें तापलासप्रेमेंनिवाला ॥ ठेवाजोलाधलाशांतिसुख ॥ २ ॥ निर्द्वंद्वनिःशंकाविचरतां मही ॥ सुखानंदहृदयींस्थिरजाला ॥ ३ ॥ विरक्तीचेंपात्रअन्वयाचेंमुख ॥ देऊनि सम्यकअनन्यता ॥ ४ ॥ निवृत्तिगयनीकृपाकेलीअसेपूर्ण ॥ कुळहेंपावनकृष्णनामें ॥ ५ ॥

अभंग ३३३. आकारींदिसेनिराकारींवसे ॥ तोचिहृदयींदिसेअरेरया ॥ १ ॥

नाहींतोआहेनादिसेनापाहे ॥ अवघाहोउनिराहेतन्मयता ॥ ध्रु० ॥ स्वरूपउखर नमोमनसार ॥ एकतत्वनिर्धारहरिनांदे ॥ २ ॥ निवृत्तीचेंखूणअवघेंचिहोणें ॥ एकानारायणेंभरलेंदिसे ॥ ३ ॥

**अभंग ३३४.** विश्वींविश्वपतिअसेपैंलक्ष्मीनाथ ॥ आपणचिसमर्थसर्वांरूपीं ॥ १ ॥ तेंरूपगोकुळींनंदाचियेकुळीं ॥ यशोदेजवळींबाळकृष्ण ॥ ध्रु० ॥ सर्वघटींनांदेएकरूपसत्ता ॥ आपणचितत्वतांसर्वांरूपीं ॥ २ ॥ निवृत्तीचेंपारकृष्णचिपैं सार ॥ गोकुळींअवतारनंदाघरीं ॥ ३ ॥

**अभंग ३३५.** एकरूपेंदिसेभेदरूपेंभासे ॥ ज्ञानियासीकैसेंएकतत्व ॥ १ ॥ तत्वतांश्रीहरिएकअसेसर्व ॥ सांडूनिदेहभावपूर्णपाहा ॥ ध्रु० ॥ देवेंविणकोठेंरितेंनाहींसर्वथा ॥ संपूर्णपूरताहरिआहे ॥ २ ॥ निवृत्तीचीखूणएकतत्वरूपें ॥ पाहातांसोहपेंगुरुखुणें ॥ ३ ॥ श्री ॥

**अभंग ३३६.** देहाच्यादीपकींएकीवस्तुचोख ॥ असोनियांशोककांकरितोसी ॥ २ ॥ देहभरिआत्मानांदेनिरंतर ॥ असतांहाविचारकांधांवतोसी ॥ ध्रु० ॥ तुझेंतूंपाहींआहेतेंघेई ॥ एकरूपहोईगुरुखुणें ॥ २ ॥ निवृत्तीचेंसारहरिरूपसदां ॥ नित्यपरमानंदारातलासे ॥ ३ ॥

**अभंग ३३७.** नेणोंपैंद्वैतअवघेंचिअद्वैत ॥ एकरूपमातकरूंआम्हीं ॥ १ ॥ अवघाचिश्रीहरिनांदेघरोघरीं ॥ दिसेचराचरींऐसेंकरा ॥ ध्रु० ॥ सेवावेचरणगुरुमूर्तिध्यान ॥ गयनिसंपन्नब्रह्मरसें ॥ २ ॥ निवृत्तीचोखडाब्रह्मरसुउघडा ॥ गुरुकृपेंनिवाडानिवडिला ॥ ३ ॥

**अभंग ३३८.** समताधराआधिंटाकाद्वैतबुद्धि ॥ आपेंआपशुद्धिगोविंदीरया ॥ १ ॥ समनांदेहरिविषमअघोरीं ॥ निवृत्तिचराचरींसांगतुसे ॥ध्रु० ॥ समशेजबाजसमकेशीराज ॥ समतुष्टेभोजआत्मराज॥ २ ॥ निवृत्तीचेंधनअखंडपरिपूर्ण ॥ आपणचिनारायणतुष्टेसदा ॥ ३ ॥

**अभंग ३३९.** रामरामजपसमत्वेंसाधावा ॥ अहंकारटाकावाअहंबुद्धि ॥ १ ॥ सुटसिरेनामेंआपेंआपसंभ्रमें ॥ नित्यनामनेमेंजपतुजाये ॥ ध्रु० ॥ देवेंविणनाहीं सर्वशास्त्रबोले ॥ हरिरूपींबोधलेतेचिधन्य ॥ २ ॥ सुखावरिसुखनिसंगरेआचरे ॥ केशवनिर्धारेंतुष्टेसदां ॥ ३ ॥ निवृत्तिम्हणेपुण्यहोईलअगाध ॥ एकनामेंगोविंद तुष्टेसदां ॥ ४ ॥

**अभंग ३४०.** दुभिलेंद्विजकुळींआलेपैंगोकुळीं ॥ नंदयशोदेजवळिबाळकृष्ण ॥ १ ॥ खेळेलाडेंकोडेंगौळणीचहूंकडे ॥ नंदाचेंकेवढेंभाग्यजाणा ॥ ध्रु० ॥

ज्यारूपेंवेधलेंब्रह्मांडनिर्मळे ॥ तेंचिहेंआकारलेंकृष्णरूपें ॥ २ ॥ निवृत्तिदिवटा कृष्णाचियावाटा ॥ नामेंचिवैकुंठापावनहोती ॥ ३ ॥

**अभंग ३४१.** देहींदेवआहेहेंबोलतीवेद ॥ परिवासनेचेभेदनदवडिती ॥ १ ॥ वासनापैंचोखतेथेंचिवैकुंठ ॥ भावोचिप्रगटहोयेजना ॥ ध्रु० ॥ नलगतिसायास करणेंउपवास ॥ नाममात्रेंपाशतुटेजना ॥ २ ॥ निवृत्तिपाहातुदेहामाजिप्रांतु ॥ देवोचिदिसतुसर्वांघटीं ॥ ३ ॥

**अभंग ३४२.** जाणिवेचेनिपैसेवासनाहेहिंडे ॥ आनानब्रह्मांडेंशोधिताहे ॥ १ ॥ तैसेंनकोजनानिरंतरवासना ॥ वैकुंठभजनाकरिजोरया ॥ ध्रु० ॥ जाणिवनेणिवअवघाश्रीअनंत ॥ नेणोनिउचितहरिभजे ॥ २ ॥ निवृत्तीचेंतटभजनअविनाश ॥ भजनेंचिपाशतुटेरया ॥ ३ ॥

**अभंग ३४३.** एकतत्वहरिअवघीसृष्टित्याची ॥ वासनामोहाचीजालीअसे ॥ १ ॥ तत्वतेंश्रीहरिस्थैतकुसरी ॥ ब्रह्मांडवोवरींक्षरलासे ॥ ध्रु० ॥ त्रिपुटिंत्रिगुणसत्वर जसार ॥ नामेंचिव्हेंारतुटेरया ॥ २ ॥ निवृत्तिसमताहरिप्रेमगुण ॥ कृष्णहेंचि ध्यानमनामाजीं ॥ ३ ॥

**अभंग ३४४.** शांतीचेंभजनक्षमेचाकळवळा ॥ गोपाळसकळांदेहींनांदे ॥ १ ॥ आचारपवित्रनामचिपैंपात्र ॥ सांठविलेंशास्त्रदोंअक्षरीं ॥ ध्रु० ॥ रूपाचेंसगुणनिर्गुणदाटलें ॥ नामेंचिआटलेंमोहजाळ ॥ २ ॥ निवृत्तिचडळउडालेंपैंभान ॥ गयनिनेंज्ञानउपदेशिलें ॥ ३ ॥ श्रीगुरुप्रसन्न ॥

**अभंग ३४५.** भेदूनिब्रह्मांडआणियेलीकळा ॥ नित्यतासोहळाहरिप्रेमें ॥ १ ॥ हरिधराचित्तींमनमारामुक्ती ॥ प्रपंचसमाप्तिहटेंपाटें ॥ ध्रु० ॥ विश्रांतिशींस्थान आसनींशयनीं ॥ हरिध्यानपर्वणीपुरेआम्हां ॥ २ ॥ निवृत्तिसागरहरिरूपनित्य ॥ सेविलातोसत्यदोअक्षरीं ॥ ३ ॥

**अभंग ३४६.** दीपाचीकळिकादीपींकीसामावे ॥ तैसाजीवशिववोळखीजोजी ॥ १ ॥ दीपआहेदेहींतयाचेहेप्रकाश ॥ त्याचेनिसावकाशहरिभजेरया ॥ ध्रु० ॥ नमिळेआयुष्यनमिळेघटिका ॥ देहक्षणएकाजाईलरया ॥ २ ॥ निवृत्तीचादीपदीपचियेमुसे ॥ आटोनिसौरसेंएकजाला ॥ ३ ॥

**अभंग ३४७.** कळिकेसिज्योतिसामावलीतेजीं ॥ तैसाहरिहासहजींसर्वगतु ॥ १ ॥ सर्वत्रभजनहरिहेचिखूण ॥ हरिहाप्रमाणदोंअक्षरीं ॥ ध्रु० ॥ नित्य मुक्तएकआत्मतत्वदीप ॥ हरिहासंकल्पकरिजेसु ॥ २ ॥ निवृत्तिसर्वदाहरिभजन दाट ॥ नित्यतावैकुंठअखंडित ॥ ३ ॥

**अभंग ३४८.** अनुभवाच्यागांवींज्ञानहेंचिफळ ॥ विज्ञानकेवळवृक्षतया ॥१॥ साधनींस्वानुभवअनुभवींअनुभव ॥ ब्रह्माचीराणिवआम्हांघरीं ॥ ध्रु० ॥ रिकामा बरळुनसेखेळेमेळें ॥ ब्रह्मचिकल्लोळेंभोगीतुसे ॥ २ ॥ निवृत्तिसरळनिरसलेंअज्ञान ॥ सर्वत्रसंपन्नआत्माराम ॥ ३ ॥

**अभंग ३४९.** गगनघांसघोंटीसर्वब्रह्मांडेंपोटीं ॥ निमूनियांशेवटींनिरालंबीं ॥ १ ॥ तेंब्रह्मसांवळेंमाजिलाडेंकोडें ॥ यशोदेमायेपुढेंखेळतसे ॥ ध्रु० ॥ ब्रह्मांडाच्याकोटीतरंगताउठी ॥ आपआपासाटींहोतजात ॥ २ ॥ निवृत्तीचेंध्यानयशोदेचेंधन ॥ वासुदेवखुणआम्हांमाजी ॥ ३ ॥

**अभंग ३५०.** प्रकृतीचेनिघायेंघायवटनव्हे ॥ आत्मारामसोयेआत्मकळिके ॥ १ ॥ कळिकाउन्मनीगोल्हाटकवळी ॥ सत्रावीचेजवळीआत्मास्वामी ॥ ध्रु०॥ हेखुणघेईसोपानाजवळी ॥ मनाचीकाजळीउरोंनेदी ॥ २ ॥ निवृत्तिम्हणेज्ञान सोपानसांग ॥ विकल्पाचापांगनाहींनाहीं ॥ ३ ॥

**अभंग ३५१.** क्षमासमनेमहाचिपरिपूर्ण ॥ रामहोईतूंनिःकामानिःसंदेह ॥१॥ तूंचिरेसाचारहोसीलपूर्णता ॥ निर्गुणींसमतानाहींजैसी ॥ ध्रु० ॥ व्योमामार्जीअभ्रजातसेसरळ ॥ त्यासिअळुमाळदृश्यनव्हे ॥ २ ॥ निवृत्तिम्हणेनव्हेहेंतैसेंचोख॥ अंतरबाह्यषेषआत्मरूपें ॥ ३ ॥

**अभंग ३५२.** रामनाममुखींतोएकसंसार ॥ येऱ्हवींअघोरनरकरया ॥ १ ॥ संसारनरकरामनामसार ॥ तरलेपामरपतितदेखा ॥ ध्रु० ॥ अजामेळनामेंतरला पतित ॥ नारायणत्वरितआलेतेथें ॥ २ ॥ हरिनामहेंचिशास्त्रपैंजयाचें ॥ तयासि यमाचेंभयनाहीं ॥ ३ ॥ उघडामोक्षमार्गगोविंदस्मरणें ॥ रामनामकीर्तनेंमोक्षपद ॥ ४ ॥ निवृत्तिसंचीतरामनाममहिमा ॥ अवघीचपौर्णिमाहरिपाठें ॥ ५ ॥

**अभंग ३५३.** श्यामाचिश्यामशेजवरिनिजतेजाविराजे ॥ सहजकेशिराजेंक्षीरार्णवीं ॥ १ ॥ शेषशयनअरुवारीगोविंदक्षीरसागरीं ॥ तोनंदयशोदेघरींक्रीडतुसे ॥ ध्रु० ॥ अनंतनामींक्षीरक्षरलासेसाचार ॥ गोपिकांसमोरहरिराजा ॥ २ ॥ नाहींयोगियादृष्टिमनोमनेंकरिसृष्टी ॥ पाहातांनदृष्टिविज्ञानहरि ॥ ३ ॥ शांतिनेणें क्षमेपारुविश्रांतिसिअरुवारु ॥ तोकैसापाउदारुगोपाळांसी ॥ ४ ॥ विचाराचेंदेटुगेंआकारनिराकारसांगे ॥ तोगोंसावीनिगेगोकुळींरया ॥ ५ ॥ निवृत्तीचेंपरब्रह्म रामकृष्णविजयब्रह्म ॥ चिंतितांचिंताभ्रमनासोनिजाय ॥ ६ ॥

**अभंग ३५४.** शांतिक्षमादयासर्वभावींकरुणा ॥ तोचिनारायणाआवडेदासु ॥ १ ॥ तोचिएकसाधुबोलिजेपैंजनीं ॥ निरंतरध्यानींकृष्णमूर्ति ॥ ध्रु० ॥

जीवाशिवएकसर्वत्रचैतन्य ॥ ऐसेंजयाकारुण्यतोचिधन्य ॥ २ ॥ तोचिएकभक्तु हरिहरिम्हणे ॥ नित्यनारायणेंतारिजेत्यासी ॥ ३ ॥ येउनीजनींसदांतोविदेही ॥ तारकुसवाहींसप्रेमळु ॥ ४ ॥ निवृत्तिसांगतुभक्तीचामहिमा ॥ करीशांतिक्षमातो विरळाअसे ॥ ५ ॥

**अभंग** ३५५. नलगतीधनेंअसारसंपत्ति ॥ वायांचिगुंपतीवासनारया ॥१॥ सारहरिनामसारहरिनाम ॥ नित्यतासप्रेमजपोंआम्हीं ॥ ध्रु० ॥ ध्येयध्यानस्थिर मनाचासांटा ॥ नामेंचिवैकुंठाभक्तगेले ॥ २ ॥ निवृत्तितत्पररामनामचिंत्तीं ॥ एकानामेंतृप्तिसर्वकाळ ॥ ३ ॥

**अभंग** ३५६. सप्तपाताळेंएकवीसस्वर्गेंपुरोनिउरलाहरि ॥ कायामायाछाया विवर्जितदिसेतोआहेदुरीनाजवळीगेबाईये ॥ १ ॥ प्रत्यक्षहरितोदावियाडोळां ॥ ऐसासद्गुरुकीजेपाहोनी ॥ तनुमनधनत्यासिदेऊनी ॥ तेवस्तुघ्यावीत्यासीमागोनिगेबाईये ॥ ध्रु० ॥ पावडांपात्रआणिकरीपरवस्तुसिभेटी ॥ ऐसातोचितोसद्गुरुरे ॥ सद्गुरुविणमूढासिदर्शनकैचेंऐसातोचिचमत्कारुगेबाईये ॥ २ ॥ एकमंत्रएकउपदेशितीगुरुतेजाणावेभूमिभारु ॥ निवृत्तिम्हणेतत्वसाक्षत्वेंदावी ॥ ऐसातोचिचमत्कारुगेबाईये ॥ ३ ॥

**अभंग** ३५७. विस्तारविश्वाचाविवेकेंपैसाचा ॥ बोलताचिवाचाहारपती ॥ १ ॥ तेंरूपश्रीधरकृष्णाचाआकार ॥ सर्वनिराकारएकरूपें ॥ ध्रु० ॥ नसतेनि जीवअसतेनिशिव ॥ तदाकारमात्रमात्रळली ॥ २ ॥ निवृत्तिस्वरूपकृष्णरूपआप ॥ विश्वींविश्वदीपआपेंआप ॥ ३ ॥

**अभंग** ३५८. तारकप्रसिद्धतीर्थेंतेंअगाध ॥ नामाचाउद्बोधनंदाघरीं ॥ १ ॥ प्रकाशपूर्णताआदिमध्येंसत्ता ॥ नातळेतोद्वैताद्वैतपणें ॥ ध्रु० ॥ निवृत्तिसाधनकृष्णरूपेंसुख ॥ विश्वींविश्वरूपहरिमाझा ॥ २ ॥

इति

## श्रीनिवृत्तिनाथाचेअभंग

॥ समाप्त. ॥

अथ

# श्रीसोपानदेवाचे अभंग प्रारंभ.

## अभंग १ ला.

**अभंग** १. नाहींनाहींभाननदिसेप्रपंच ॥ रोहिणीआहाचमृगजळ ॥ १ ॥ तुटलासेसांटावासनाचोखाळ ॥ दिननिशींफळरामझाला ॥ ध्रु० ॥ रामेंविणदुजें नाहींपैंहोविजें ॥ बोलंतुसहजेंवेदुजाणा ॥ २ ॥ निवृत्तिखुणाविज्ञानदेवाहरि ॥ सोपानझडकरीझोंबियेला ॥ ३ ॥

**अभंग** २. काढलेंकुटाळवासनाबळ ॥ सर्वहागोपाळभरियेला ॥ १ ॥ गेलापैंपरतेंशरीरहेंरितें ॥ नाशिवंतभूतेंदुरीकेलीं ॥ ध्रु० ॥ स्थावरजंगमस्थावरिला राम ॥ सर्वगतशामनिःसंदेहें ॥ २ ॥ सोपानविनटेपरब्रह्मघोटे ॥ प्रपंचसपाट निवटियेला ॥ ३ ॥

**अभंग** ३. रामसर्वोत्तमयानामेंनिखळ ॥ जनहेंसफळदिसताहे ॥ १ ॥ भिन्ननाहींदुजेंसर्वआत्माराज ॥ नाचतातीभोजयोगिराज ॥ ध्रु० ॥ मातापितादेव गृहदाराजन ॥ सर्वजनार्दनसर्वारूपीं ॥ २ ॥ सोपानखेचरब्रह्ममाजिवडे ॥ ब्रह्मांडाएवढेआत्माराम ॥ ३ ॥

**अभंग** ४. दुजेपणींठावद्वैततेंफेडिलें ॥ अद्वैतबिंबलेंतेजोमय ॥ १ ॥ तेजाकारदिशाबिंबींबिंबएक ॥ निवृत्तीनेंचोखदाखविलें ॥ ध्रु०॥ निमालीवासनाबुडालीभावना ॥ गेलीतेकल्पनाठावनाहीं ॥ २ ॥ सोपाननैश्वरपरब्रह्मसाचार ॥ सेवितुअपारनामघोटें ॥ ३ ॥

**अभंग** ५. हरिविणदुजेंनदेखेचित्तमाझें ॥ म्हणोनिसहजेंविचरतु ॥ १ ॥ सर्वहरिहरितोमाझाकैवारी ॥ दुजीभरोवरीनेघोंआम्हीं ॥ ध्रु० ॥ रामहासकळसर्वआम्हांआहे ॥ दुजेंतेंनसाहेपरब्रह्मीं ॥ २ ॥ सोपानसलगीविनवितोतुम्हां ॥ सर्वहापरमात्माआम्हांदिसे ॥ ३ ॥

**अभंग** ६. हरिविणनाहींवेदांदिकमती ॥ श्रुतित्यासंपत्तिजयारूपीं ॥ १ ॥ हरिहाचिसर्वउपनिषदभाव ॥ रोहिणीचीमावजनींदिसे ॥ ध्रु० सर्वघटींरामजीवशिवसम ॥ सर्वरूपेंब्रह्मभरलेंसदां ॥ २ ॥ सोपाननिकटपरब्रह्मसेवी ॥ सर्वहा

गोंसाविविठ्ठलराज ॥ ३ ॥ श्री

अभंग ७. आम्हीनेणोंमायानेणोंतेहीकाया ॥ ब्रह्मलवलाह्याआम्हांमाजी ॥१॥ मीतूंगेलेंब्रह्मींमनगेलेंपूर्णी ॥ वासनातेजनींब्रह्मजाली ॥ ध्रु० ॥ जीवशिवमात्र आपणचिदेव ॥ केलाअनुभवगुरुमुखें ॥ २ ॥ सोपानब्रह्मवर्ततसेसम ॥ प्रपंचाचाभ्रमनाहींनाहीं ॥ ३ ॥ श्रीसद्गुरुदत्त ॥

अभंग ८. दिनव्योमताराग्रहगणशेखीं ॥ एकहृषीकेशीसर्वआम्हां ॥१॥ ब्रह्मींविणनाहींरिताठावोपाही ॥ निवृत्तीच्याठायींबुडीदेत ॥ ध्रु० ॥ सर्वहेंनिखळ आत्मारामसर्व ॥ नाहींदेहभावविकल्पता ॥ २ ॥ सोपाननिकटगुरुनामेंपेठ ॥ नित्यतावैकुंठजवळीअसे ॥ ३ ॥ श्री ॥

अभंग ९. पाहोतेंननटेमनतियेवाटे ॥ बोलणेंचिखुंटेबोलणेपणें ॥ १ ॥ परतल्याश्रुतिपडियेलेंमौन्य ॥ शास्त्रतेंसंपन्ननेणेतया ॥ ध्रु० ॥ गेलातोआचारअवघाचिविचार ॥ परेपरतापरपरब्रह्म ॥ २ ॥ सोपानदयाळगुरुनामेंबळ ॥ आपण निखळआपरूपें ॥ ३ ॥

अभंग १०. आपरूपहरिआपणचिदेव ॥ आपणचिभावसर्वजाला ॥ १ ॥ सर्वहरिहरिबाह्यअभ्यंतरीं ॥ एकचराचरींआत्माराम ॥ ध्रु० ॥ सर्वकाळसमनाहींतेथें विषम ॥ आपणचिरामसर्वज्योती ॥ २ ॥ सोपानतिष्ठतरामनामलीन ॥ मनतेथें मौन्यएकपणें ॥ ३ ॥

अभंग ११. निःकामनिश्चळनिश्चितस्वरूप ॥ तेथेंनिर्विकल्पमनगेलें ॥ १ ॥ ध्येय गेलेंध्यानध्यातामाजिपूर्ण ॥ आपणसनातनहोऊनिठेला ॥ ध्रु० ॥ निर्गुणनिरालंबनिर्विकारफळ ॥ आपणचिसकळहोऊनिठेला ॥ २ ॥ सोपानजिव्हाळेंमनाचेंतेंआळें ॥ परब्रह्मसांवळेंतयामाजी ॥ ३ ॥

अभंग १२. ज्ञानदेवींज्ञाननाहींतेथेंभिन्न ॥ प्रपंचाचेंभरणतेथेंनाहीं ॥ १ ॥ स्वरूपाचीखूणहोऊनिसफळ ॥ भोगीसर्वकाळसच्चित्सत्ता ॥ ध्रु० ॥ आत्मापरमात्माभेदाभेदद्वंद्व ॥ एकतत्वअभेदजनींवनीं ॥ २ ॥ सोपानदीपनदीपितेंजीवन ॥ तयामाजींमनएकजालें ॥ ३ ॥

अभंग १३. वैकुंठसगळेंनकरूंआगळें ॥ मनब्रह्ममेळेएठेलें ॥ १ ॥ उपमेंवैकुंठब्रह्महेंतत्वबीज ॥ सूचनाअखंडसर्वांभूतीं ॥ ध्रु० ॥ उदयोस्तुपरिमाण ब्रह्म ॥ चंद्रसूर्यनेमहरपलें ॥ २ ॥ सोपानतोक्षेत्रीजनहेंचिक्षेत्र ॥ तेथेंतोविचित्र हारपला ॥ ३ ॥ श्रीगुरुप्र० ॥

अभंग १४. शांतिदयाक्षमातेथीलउपाया ॥ निर्गुणींतेमायाआपरूप ॥ १ ॥

ज्योतिरूपछायासर्वहेंनिर्गुण ॥ आत्मारामाभिन्ननाहींनाहीं ॥ ध्रु० ॥ मौन्येंपरेमि-ठीपश्यंतीसिनुठी ॥ मध्यमेच्यावेटींखुंटेतारूं ॥ २ ॥ सोपानवैखरीदेहामाजिभ-री ॥ पूर्णतोश्रीहरिबिंबींबिंब ॥ ३ ॥

अभंग १५. नादब्रह्ममुसेनादरूपवसे ॥ तैसाजनींदिसेआत्मपणें ॥ १ ॥ बा-हेरसाबडाआत्मादिसेघडा ॥ मातियेचावेढाजीवनालागीं ॥ ध्रु० ॥ तैसेंहेंशरीर आत्मपणेंनीट ॥ मनहेंनिकटचोखाळपणें ॥ २ ॥ सोपानसाजिरेंब्रह्मतेंगोजीरें ॥ जीवनसाकारब्रह्महेतु ॥ ३ ॥

अभंग १६. नादरसिंलीनब्रह्मसामावलें ॥ त्यामाजिसानुलेंमनचोख ॥ १ ॥ मनहेंनिकटब्रह्मपणेंचोख ॥ ब्रह्मींब्रह्मलेखएकपणें ॥ ध्रु० ॥ साशंकितगावोजा-लापरिमाण ॥ घटमठादिनहारपला ॥ २ ॥ सोपानसोपारेंनिरालंबनिर्धारें ॥ नंदाचेंगोजिरेंमाजिखेळे ॥ ३ ॥

अभंग १७. नादरूपठसानिरालंबजाला ॥ सगुणींउदेलातेजाकार ॥ १ ॥ तेजरूपतेजींआपरूपकाजी ॥ जीवशिवभोजींनांदताती ॥ ध्रु० ॥ राहातेंपाहातें जिवातेंपोखीतें ॥ आपणचिउखीतेंदिसेएक ॥ २ ॥ सोपानींनलगेप्रपंचावियोग ॥ ब्रह्मार्पणभोगनुरेतोही ॥ ३ ॥

अभंग १८. पाहाणेंपरिसणेंनादरूपींगेलें ॥ निराकारठेलेंएकतत्वेंसि ॥ १ ॥ एकतत्वेंसिहरिएकरूपमाझा ॥ भिन्नभावदुजानाहींनाहीं ॥ ध्रु० ॥ संगपरिकर सांपडलाआम्हां ॥ सर्वआत्मारामपूर्णपणें ॥ २ ॥ सोपानदेव्हडेंमनमाजिवडें ॥ ब्रह्मांडाएवढेंगिळीयेलें ॥ ३ ॥

अभंग १९. आत्मरूपसुखआत्मपणेंचोख ॥ निर्गुणींचेंचोखसगुणजालें ॥ १ ॥ रूपअरूपरूपामाजिसर्व ॥ रूपींभावाभावनाठवती ॥ ध्रु० ॥ बुडालेंसगुणना-हींमतींपण ॥ अंतरींचीखुणमावळली ॥ २ ॥ सोपानगुरूतेंब्रह्मपुरतें ॥ पुसोनि आरुतेंठाकीयलें ॥ ३ ॥

अभंग २० उघडीदृष्टिकरींइंद्रियांसकट ॥ वैकुंठींचीवाटपंढरिजाण ॥ १ ॥ दृष्टिभरीपाहोविठ्ठलदैवत ॥ पूर्णमनोरथविठ्ठलदेवें ॥ ध्रु० ॥ हाचिमार्गसोपाजना-सिउघड ॥ विषयाचेंजाडटाकीपरतें ॥ २ ॥ सोपानम्हणेगुंफिसीसर्वथा ॥ मग नव्हेंउलथाभक्तिपंथें ॥ ३ ॥

अभंग २१. पृथ्वीसांवळीआकाशसांवळें ॥ मनहेंवोंवळेंअभक्तांचें ॥ १ ॥ ब्रह्महेंसांवळेंनदेखोंवोंवळें ॥ असोखेळेमेळेंइयेजनीं ॥ ध्रु० ॥ ब्रह्मांडपंढरीसांवळी हेखरी ॥ तारीसिनिर्धारींएकानामें ॥ २ ॥ सोपानअखंडसांवळाप्रचंड ॥ नबोले

वितंडहरिविण ॥ ३ ॥

अभंग २२. मनआधींमुंडींवासनेतेंखंडीं ॥ विठ्ठलब्रह्माडींएकआहे ॥ १ ॥ मनहेंसोंवळेंसदाशौचकरी ॥ तुजनिरंतरींहरिपावे ॥ ध्रु० ॥ विवेकवैराग्यज्ञानाचेंसौभाग्य ॥ सोंवळाआरोग्यहरिदेख ॥२॥ सोपाननेणेसलगीचासोंवळा ॥ नित्य वेळोवेळांस्मरेहरि ॥ ३ ॥

अभंग २३. शरीरनिर्मळवासनाटवाळ ॥ कांरेतूंबरळभक्तिवीण ॥ १ ॥ सर्वब्रह्महरिनेणसिसोंवळें ॥ एकाचिगोपाळेंजनवन ॥ ध्रु० ॥ आपपृथ्वीतेजवायोव्योम ॥ पंचभूतींसमवर्ततसे ॥ २ ॥ सोपानम्हणेगुरूचाउपदेशशुद्ध ॥ तरीचवासनाप्रबुद्धतयानरा ॥ ३ ॥

अभंग २४. सागरींचेंतोयजगानिवारित ॥ मागुतेंभरितंपूर्णपणें ॥ १ ॥ तैसेआम्हीदासतुजमाजिउदास ॥ तूंआमुचानिवाससर्वदेवा ॥ ध्रु० ॥ तुजमाजि विरोंसुखदुःखविसरों ॥ तुझ्यानामेंतरोंयेचिजन्मीं ॥ २ ॥ सोपाननिकटबोलोनि सरळ ॥ तुष्टलागोपाळअभयदेत ॥ ३ ॥

अभंग २५. मीमाझीकल्पनापळालीवासना ॥ जनींजनार्दनासेवीतुसें ॥१॥ तूंतंवसंपन्नआमुचेंहोधन ॥ सांगितलीखूणनिवृत्तिदेवीं ॥ ध्रु० ॥ तुजमाजिप्रेमगेलेंसप्रेमें ॥ जपव्रतनेमहारपले ॥ २ ॥ सोपानसगळानदिसेइहींडोळां ॥ तूंचिबा गोपाळाआत्माराम ॥ ३ ॥

अभंग २६. तुझातूंचिथोरतुजनाहींपार ॥ आमुचाआचारविठ्ठलदेव ॥ १ ॥ आपींसधरसर्वहाश्रीधर ॥ सर्वकुळाचारपांडुरंग ॥ ध्रु० ॥ नदिसेदुसरेंनिर्धारितां खरें ॥ श्रीगुरुविचारेंकळलेंआम्हां ॥ २ ॥ सोपानम्हणेरखुमादेवीवर ॥ तूंचि आमुचेंपरकुळवटीं ॥ ३ ॥ श्रीगुरु ॥

अभंग २७. हरिविणदुजेंनावडेपैंदैवत ॥ जऱ्हीसमर्थबोलेसृष्टि ॥ १ ॥ हरिरामगोविंदानित्यहाचिछंद ॥ हृदयींआनंदप्रेमबोधु ॥ ध्रु० ॥ हरिहेंचिदैवतसमर्थपैंआमुचें ॥ बोलणेंवेदांचेंबोलतीमुनी ॥ २ ॥ सोपानअलगटुनामपाठवाचें ॥ नित्यविठ्ठलाचेचरणहृदयीं ॥ ३ ॥

अभंग २८. हरिविणभावोनधरावापोटीं ॥ सर्वभावेंसृष्टिएकातत्वें ॥ १ ॥ तत्वताश्रीहरिसर्वांघटींआहे ॥ उभारोनिबाहेवेदबोले ॥ ध्रु० ॥ हरिविणनाहींजीव शिवपाहीं ॥ शिवाच्याहोदेहींआत्माहरि ॥ २ ॥ सोपानम्हणेहरिविणनाहींतत्व ॥ हरिहाचिसर्वत्रसर्वांवसे ॥ ३ ॥

अभंग २९. हरिनांदेदेहींऐसाभावोआहे ॥ परतोनिपाहेअरेजना ॥ १ ॥प

रतलियादृष्टिचैतन्याचीसृष्टि ॥ नामेंचिवैकुंठींपावेजना ॥ ध्रु० ॥ हाबोधश्रीरंगें अर्जुनाउपदेशु ॥ सर्वहृषीकेशुसर्वीरूपीं ॥ २ ॥ सोपानधारणाहरिनांदेसर्वत्र ॥ त्याचेंचिचरित्रक्षरलेंसे ॥ ३ ॥

**अभंग ३०.** हरिअसेदेहींहाचिभावोखरा ॥ वायांतूंसैराधांवूंनको ॥ १ ॥ धांवतांअवचटेंपडसीलव्यसनीं ॥ संसारघसणींयोनिमाळे ॥ ध्रु० ॥ हरिहेंचिध्यान निरंतरकरी ॥ बाह्यअभ्यंतरींएकुराम ॥ २ ॥ सोपानम्हणेरामनांदेसर्वांघटीं ॥ विश्वींजगजेठीक्षरलासे ॥ ३ ॥

**अभंग ३१.** हरिनामजपेसहस्रवरिसोपें ॥ जातीलरेपापेंअनंतकोटी ॥ १ ॥ हरिविणनामनाहींपारेसार ॥ दुसराविचारकरूंनको ॥ ध्रु० ॥ हरिध्यानचोखपवित्रपरिकर ॥ नित्यताशंकरहरिध्यानीं ॥ २ ॥ सोपानम्हणेहरिजपकरारेसर्वथा ॥ नपावालव्यथाभवजाळीं ॥ ३ ॥

**अभंग ३२.** ज्याचेमुखींहरितोचिधन्यजगीं ॥ तरलापैंवेगींवेदुबोले ॥ १ ॥ हरिहाचिआम्हांतत्वपैंसोहपें ॥ हरितीलपापेंहरिनामें ॥ ध्रु० ॥ वैकुंठींचेंसुखनलगेपैंचित्तीं ॥ हरिहेचिमूर्त्तिविठ्ठलध्यावो ॥ २ ॥ याचेनिस्मरणेंकैवल्यसाचार ॥ सोपानविचारहरिजपे ॥ ३ ॥

**अभंग ३३.** विठ्ठलपैंसारहाजपुआमुचा ॥ आणित्याशींवाचानित्यनेमु ॥ १ ॥ गोविंदश्रीहरिहेंचितोउच्चारी ॥ शिवचराचरींआत्मारामु ॥ ध्रु० ॥ नामेंविणनेणेंदुयाचीमातु ॥ गोविंदस्मरतुशिवराणा ॥ २ ॥ सोपानधारणागोविंदपाठाची ॥ कोटिपैंकुळांचीकुळवटी ॥ ३ ॥

